माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५मधील कलम १८(१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक: ३८०/२०२५**

| तक्रारकर्ता | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी |
| श्री. श्रीपाद शंकरराव चोरघडे, व्दारा- निलेश धवड, १०७, गगनसिटी अपार्टमेंट, पिपळा, नागपूर-४४००३७ | उपअभियंता, नगर रचना विभाग, महानगरपालिका, नागपूर | नगर रचनाकार, नगर रचना विभाग, महानगरपालिका, नागपूर |

## सुनावणी दिनांक १७.०२.२०२६

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार व्दितीय अपील क्र. ११६४/२०२५ व १२०१/२०२५ मध्ये दिनांक १८.०८.२०२५ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे.

सदर तक्रारीवर आज दिनांक १७.०२.२०२६ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, नगर रचना विभाग, महानगरपालिका, नागपूर, श्रीमती वैजयंती वि. आडे, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, नगर रचना विभाग, महानगरपालिका, नागपूर, श्री. जगदिश मारोतराव बावनकुळे व प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका, नागपूर श्री. ऋतुराज जाधव उपस्थितआहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधीलकलम १९ (३) नुसार आयोगात दाखल केलेल्या व्दितीय अपील क्र. ११६४/२०२५ व १२०१/२०२५ मध्ये दिनांक १८.०८.२०२५ रोजी पुढील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात आले आहे.

" विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, नगर रचना विभाग, महानगरपालिका, नागपूर यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांच्या आत अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती रेकॉर्डवर उपलब्ध नाही. तसेच अपिलार्थी यांनी माहिती अर्जात नमूद केल्याप्रमाणे सदर बांधकामाबाबत कोणतीही परवानगी देण्यात आली नसल्याने अपिलार्थीस सुस्पष्ट लेखी कळविण्यात यावे." या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात आला होता.

तक्रारकर्ता यांनी आयोगाच्या उपरोक्त आदेशाची अंमलबजावणी न झाल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अंतर्गत दिनांक १६.०९.२०२५ (प्राप्त दि. १६.०९.२०२५) रोजी आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. या तक्रार अर्जामध्ये तक्रारदार यांनी "आपले आदेशानंतरही गैरअपिलार्थी द्वारे माहिती सुस्पष्ट व योग्य न दिल्यामुळे आपले आदेशाची अवहेलना होत आहे व माझे माहिती अधिकाराचे हनन होत आहे. करीता या अर्जाद्वारे या प्रकरणाची पुनश्च: सुनावणी घेण्यात यावी

किंवा उपरोक्त मागितलेली माहिती योग्य व सुस्पष्ट देण्याचे आदेश पारीत करण्यात यावे किंवा सदर कार्यालयास/माहिती अधिकारी यांना दंडीत करण्यात यावे, ही नम्र विनंती." असे नमूद करुन तक्रार अर्ज केला आहे.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, आयोगाचे व्दितीय अपील क्र. ११६४/२०२५ व १२०१/२०२५, मध्ये दिनांक १८.०८.२०२५ रोजी सुनावणी घेवून सदर आदेश दिनांक १९.०८.२०२५ रोजी निर्गमित करण्यात आले असून सदर आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, नगर रचना, मनपा, नागपूर यांनी दिनांक २६.०८.२०२५ च्या पत्रान्वये तक्रारकर्ता, श्री. श्रीपाद शंकरराव चौरघडे यांना मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांनी आदेशीत केल्याप्रमाणे अभिलेखापाल यांनी दिनांक २२.०८.२०२५ ला लिखित दिल्याप्रमाणे अभिलेख कक्षात नस्तीचा शोध घेतला असता उक्त धारीका आढळून आलेली नाही. तसेच खसरा क्र. ९५/२ सुविकास गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. मौजा-हुडकेश्वर (बुं) व खसरा क्र. ७८/५ पवनपुत्र गृहनिर्माण सोसायटी मौजा-हुडकेश्वर(बुं) याबाबत कोणतीही परवानगी दिल्याने उपलब्ध अभिलेखावरुन दिसून येत नाही, असे कळविले आहे.

**निष्कर्ष:-**

तक्रारकर्ता, श्री. श्रीपाद शंकरराव चोरघडे यांनी माहिती अधिकार अधिनियमातील कलम १८(१) अन्वये दिनांक १६.०९.२०२५ रोजी आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. तक्रारकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, नगर रचना विभाग, महानगरपालिका, नागपूर यांच्याकडे दिनांक २६.१०.२०२४ रोजी (१) हुडकेश्वर (बु) येथील सुविकास गृहनिर्माण सह संस्था मर्यादीत यांचे लेआऊट (खसरा क्र. ९५/२) मधील प्लॉट क्र. ९१ (एक्यानव) मधील इमारतीचे बांधकामाची परवानगी दिलेली/घेतलेली आहे काय? (२) उपरोक्त बांधकामाची परवानगी दिली किंवा घेतली असल्यास कृपया त्याची प्रत पुरवावी" असे नमुद करुन एकुण २ मुद्दयांवर माहिती मागितलेली होती. परंतु मागितलेली माहिती न मिळाल्यामुळे तक्रारकर्ता श्री. श्रीपाद शंकरराव चोरघडे यांनी दिनांक २४.१२.२०२४ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा नगर रचनाकार, नगर रचना विभाग, महानगरपालिका, नागपूर यांच्याकडे प्रथम अपील अर्ज दाखल केला होता. त्यांच्या या प्रथम अपील अर्जावर दिनांक १४.०१.२०२५ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांचे अपील भागश: मान्य करीत प्रथम अपील अर्ज निकाली काढण्यात आले होते. परंतु प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश अमान्य असल्याने तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर आयोगाकडे दिनांक २२.०५.२०२५ व दिनांक २७.०५.२०२५ रोजी एकूण दोन द्वितीय अपील अर्ज दाखल केले होते. त्यांच्या दोन्ही द्वितीय अपील अर्जावर दिनांक १८.०८.२०२५ रोजी सुनावणी घेवून दिनांक १९.०८.२०२५ रोजी आदेश निर्गमित करण्यात आला होता.

या आदेशाने आणि महानगरपालिकेच्या नगर रचना विभागाने दिलेल्या उत्तराने समाधान न झाल्याने तक्रारकर्ता, श्री. श्रीपाद शंकरराव चोरघडे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) चा वापर करीत तक्रार अर्ज दाखल केला. त्यांच्या या तक्रार अर्जावर आयोगापुढे आज दिनांक १७.०२.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली. तक्रारकर्ता आणि प्राधिकरणाचा अशा दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकल्यानंतर आयोगाकडून नगर रचना विभाग, महानगरपालिका, नागपूर यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी

हुडकेश्वर (बु) येथील खसरा क्र. ९५/२ मधील प्लॉट क्र. ९१ मध्ये व खसरा नं. ७८/५ मधील प्लॉट क्र. ५५ या ठिकाणी प्रथम भेट द्यावी आणि स्थळ पाहणी करुन संबंधित भुखंडावर महानगरपालिकेच्या परवानगीशिवाय ते निर्मिती कार्य झाले आहे काय? याबाबत १५ दिवसात आयोगास अहवाल सादर करावा व त्याची एक प्रत तक्रारकर्ता यांना पुरवावी.

सबब, आयोग खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. नगर रचना विभाग, महानगरपालिका, नागपूर यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी हुडकेश्वर (बु) येथील खसरा क्र. ९५/२ मधील प्लॉट क्र. ९१ मध्ये व खसरा नं. ७८/५ मधील प्लॉट क्र. ५५ या ठिकाणी प्रथम भेट द्यावी आणि स्थळ पाहणी करुन संबंधित भुखंडावर महानगरपालिकेच्या परवानगीशिवाय ते निर्मिती कार्य झाले आहे काय? याबाबत १५ दिवसात आयोगास अहवाल सादर करावा व त्याची एक प्रत तक्रारकर्ता यांना पुरवावी. तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करावी.

२. या आदेशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(गजानन निमदेव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

**ठिकाण :** नागपूर
**दिनांक:** १७.०२.२०२५

जा.क्र. 1429 दि. 20 FEB 2026